# अधिकृत रिसोर्स सेंटरसाठी 'कर्मयोगी'ची निवड

पंढरपूर : तंत्र शिक्षणातील दर्जासाठी सर्वोच्च मानली जाणारी संस्था म्हणजे आय. आय .टी. मुंबईतर्फे विद्यार्थी, शिक्षकांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने विविध उपक्रम राबविले जातात. त्यापैकी स्पोकन ट्युटोरियल या उपक्रमासाठी अधिकृत सेंटर म्हणून शेळवे येथील कर्मयोगी इंजिनिअरिंग कॉलेजची निवड केली असून, तसे पत्र ही संस्थेस देण्यात आले आहे.

देशातील विविध विद्यापीठांनी याबाबत करार केले आहेत. यामध्ये १२१५ संस्थांनी सहभाग नोंदविला आहे. सन २०१० साली स्पोकन ट्युटोरिअलची सुरुवात झाली असून आजपर्यंत चार लाखांपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना लाभ झाला आहे.

आयआयटी मुंबईच्या तज्ज्ञांनी खास सॉफ्टवेअर तयार केले असून त्यात एनिमेशन, ग्राफिक्स, स्क्रिपटिंग, प्रोग्रामिंग सॉफ्टवेअर फॉर स्कूल, युटीलिटी, केमिस्ट्री केमिकल, कॉम्प्युटेशनल फ्ल्युड डायनामिक्स व ईडीए टुल्स सॉफ्टवेअर इत्यादींचा अंतर्भाव केला आहे. याकरिता इंटरनेटची आवश्यकता नाही. कोणताही विषय विद्यार्थ्यांना शिकविताना शिक्षकांना त्याचे उत्तम ज्ञान असणे आवश्यक आहे. या कारणाने संस्थेतील २ ते ४ शिक्षकांना याबाबतचे ज्ञान दिले जाते. प्रत्येक क्षेत्रातील विद्यार्थ्यांमध्ये शिकण्याची प्रतिभा असते. परंतु, योग्य मार्गदर्शनाची गरज असते. सध्याचे युग तंत्रज्ञानाचे युग असल्याने विश्व जोडण्यासाठी आयटी क्षेत्राचे ज्ञान असणे आवश्यक आहे. तंत्रशिक्षणच नव्हे तर इतर पारंपरिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना याचा लाभ घेता येणार आहे.

या रिसोर्स सेंटरच्या माध्यमातून पंचक्रोशीतील विविध संस्थांनाही सहभागी करुन सर्वांच्या सहकार्याने विकास साध्य होऊन ग्रामीण भागातील विद्यार्थीही जगातील अद्ययावत माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रात आपले नाव कमावू शकतात. त्यासाठी कर्मयोगी कटिबद्ध असल्याचे संस्थेचे अध्यक्ष प्रशांत परिचारक यांनी सांगितले. (प्रतिनिधी)